जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ०४ दिनांक - ०२/०१/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

# अभिवादन सोहळयास आलेल्या अनुयायांची सोनसाखळी चोरणाऱ्या ०७ आरोपींना पोलीसांनी केले जेरबंद

दि.०१/०१/२०२४ रोजी लोणीकंद पोलीस ठाणे हददीत पेरणे गाव येथील पेरणे जयस्तंभ अभिवादनास लाखो अनुयायी मोठया प्रमाणात आले होते. सदर जयस्तंभ अभिवादनास आलेले अनुयांयी हे पेरणे टोल नाका, पुणे नगर रोड येथुन बसमधुन प्रवास करुन अभिवादनास जाण्याकरीता बसमध्ये चढत असताना अज्ञात इसमांनी गर्दीचा फायदा घेवुन सोनसाखळी चोरी केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

संशयीत इसमांनी जयस्तंभ ते पेरणे टोलनाका परीसरात सोनसाखळी चोरल्या होत्या त्यातील चोरी करणा-या इसमांना नागरीकांचे मदतीने पोलीसांनी त्याच दिवशी अटक केली आहे. सोनसाखळी चोरी करणारे इसमांविरुध्द लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर येथे १) गुन्हा रजि नं. ०२/२०२४ भा.द.वि.क. ३९२,३४ २) गुन्हा रजि नं. ०३/२०२४ भा.द.वि.क. ३९२,३४ ३) गुन्हा रजि नं. ०४/२०२४ भा.द.वि.क. ३९२,३४ असे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदर गुन्हयांचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विश्वजित काइंगडे लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली रविंद्र गोडसे, सपोनि, गजानन जाधव, सपोनि शिरीष भालेराव हे करीत आहेत.

सदरचे एकुण ०७ आरोपींना आज रोजी मा. न्यायदंडाधिकारी सो़, शिवाजीनगर कोर्ट यांचे समक्ष पोलीस कस्टडीची रिमांड मिळणेकामी हजर केले असता **महीला आरोपी नामे सौ. अरुणा किशन गायकवाड वय ४० वर्षे, रा. नुराणी गल्ली, नागेश शाळेचे पाठीमागे जामखेड ता. जामखेड जि. अहमदनगर हिस मा. कोर्टाने मॅजिस्ट्रीट कस्टडीची रिमांड मंजुर केलेली आहे. तसचे पुरुष आरोपी नामे १) रुषीकेश बंडु जाधव वय २२ वर्षे, रा.गांधीनगर,नुर कॉलनी, तेलगाव नाका ता.जि. बीड २)अनिल उत्तम पवार वय २२ वर्षे,रा.नवगण राजुरी,खडकवस्ती जि. बीड ३) सचिन श्रीमंत गुंजाळ वय ३५ वर्षे, रा.खडकी देवळा, ता. वडवणी जि. बीड ४)शंकर सर्जेराव गायकवाड वय ३४ वर्षे, रा.नाळवंडी नाका ता जि.बीड ५) मिलींद वसंत शिंदे वय २० वर्षे रा.एन १२टीव्ही सेंटर जवळ, शताब्दीनगर, ता.जि.औरंगाबाद ६) नितेश रमेशराव बोधणकर वय ३४ वर्षे,रा.मु.पो.पिंपळगाव,बहीणाई ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती** यांना दिनांक ०५/०१/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केलेली आहे.